१

Inward No GIP/709/18
Date: 04/07/18


# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/मान्यता/2018/४९२

दिनांक : 3 JUL 2018

प्रति,
प्राचार्य,
कै. श्रीम. हंजाबाई गहलोत चॅरिटेबल ट्रस्टचे,
गहलोत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,
प्लॉट नं. ५९, सेक्टर-१४, कोपरखैराने,
नवीन मुंबई-४००७०९.

(डीटीई कोड : 3235)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्रमांक : वेस्टर्न/१-३५०८३०५३१७/२०१८/ईओए, दिनांक : १०.४.२०१८.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: मान्यता-२०१८/(प्र.क्र.१३९/१८) तांशि-५, दिनांक : ८.६.२०१८.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भ क्रमांक २ वरील शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | डिप्लोमा इन फार्मसी | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. तसेच संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु. ३.०० लाख खाते क्रमांक ५४९९४०५०००६७१७/५, दि. १२.६.२०१८ अन्वये, सिंडीकेट बँक, शाखा- कोपरखैराने, येथे संस्था व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करण्यास व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. शासनाने, संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया यांना राहतील.

४. सदर अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने माहितीसाठी.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
४. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्ती.

GAHLOT INSTITUTE OF PHARMACY

PRINCIPAL
GAHLOT INSTITUTE OF PHARMACY
Plot No. 59, Sector - 14,
Kopar Khairne, Navi Mumbai - 400709